दुरध्वनी क्र. ०२२-२२७० ८७३८
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

# मुंबई विद्यापीठ

सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.

**No. UDSTAT/ICD/2018-19/ 92 of 2018**

दिनांक : १५ ऑक्टोबर, २०१८

परिपत्रक :-

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षाकरीता ऑनलाईन विद्यार्थी संख्या बाबतची (Student on roll www.eoffice.mu.ac.in/statistical) माहिती नोंदविणेबाबत. (दिनांक ३० संप्टेबर २०१८ नुसार)

महोदय/महोदया,

मुंबई विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख व विद्यापीठ संलग्नीत महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांचे उपरोल्लेखित केलेल्या विषयाकडे आपले लक्ष वेधू इच्छितो कि, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षाकरीता विचारण्यात आलेले विद्यार्थी संख्या बाबतची ऑनलाईन माहिती अत्यंत महत्वाची असल्याकारणाने विद्यापीठाच्या **www.eoffice.mu.ac.in/statistical** या संकेतस्थळावर (web portal) उपलब्ध असून ती तात्काळ दिलेल्या विवरण पत्रानुसार (formats) भरण्यात यावी.

सदर विद्यार्थी संख्येबाबतची माहिती विद्यापीठ आयोग, भारतीय विश्वविद्यालय संघ, केंद्रशासन, उच्चशिक्षण व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई संचालनालय, उच्च शिक्षण, पुणे, सह-संचालनालय, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, इत्यादी महत्वाच्या शासकिय नियंत्रक संस्था/विभाग यांना आवश्यक असलेली महत्वाची माहिती सर्व संबंधित शासकिय विभागांना ठराविक कालावधीत देणे. त्याचप्रमाणे माहितीच्या अधिकारांतर्गत विचारण्यात आलेल्या विविध माहितीच्या सदरा खालील आवश्यक ती माहिती सुद्धा सादर करणे अनिवार्य असल्यामुळे ती आपल्या विद्यापीठ विभाग, महाविद्यालये व संस्थेमार्फत प्रति शैक्षणिक वर्षानुसार दिलेल्या विवरण पत्रानुसार (Formats) ऑनलाईन माहिती संकेतस्थळाच्या माध्यमातुन सदर कक्षास **सोमवार दिनांक १२ नोव्हेंबर, २०१८** पर्यंत सादर करणे अत्यंत गरजेचे व सक्तीचे आहे. त्याचबरोबर सदरची माहिती भरताना काही महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे आपल्या माहितीसाठी :-

१. **शैक्षणिक वर्षे २०१८-१९ या वर्षापासून दिव्यांग (Handicapped) विद्यार्थी व शिक्षक यांना त्यांच्या प्रवर्गामध्ये (Caste) नोंदणी करणे व त्याचप्रमाणे त्यांना दिव्यांग वर्गात सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे. सदर विद्यार्थी व शिक्षक यांना फक्त दिव्यांग वर्गात नमुद केल्यास त्यांची एकुण संख्या बेरजेमध्ये समाविष्ट किंवा मोजली जाणार नाही.**

२. **Staff Statistics भरताना अनुदानित (Aided), विनाअनुदानित (Unaided), व स्वयं वित्त (Self Finance) शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचा-यांची माहिती वेगवेगळी भरण्यात यावी,** याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त सर्व सारांश लक्षात घेता आपणांस विदित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या वर्षाकरीता अत्यावश्यक असलेली विद्यार्थी संख्येबाबतची ऑनलाईन माहिती ही दिलेल्या सर्व विवरण पत्रानुसार (Including Temporary Teaching/Non-Teaching staff) (formats) अचूकतेने व विनाविलंब भरण्याविषयीची सुचना आपल्या अधिपत्याखालील असलेले नोडल अधिकारी व संबंधित कर्मचारी वर्ग यांना देण्यात यावी. त्याचप्रमाणे सदरची माहिती भरल्यानंतर प्रमाणपत्रामध्ये महाविद्यालयीन शिक्का व आपल्या सहीने परिपुर्ण असलेले प्रमाणपत्र/हमीपत्र सांख्यिकी कक्षास सादर केल्याशिवाय महाविद्यालय/संस्था यांच्यामार्फत येणारे परिक्षा अर्ज (Exam form), नोंदणी अर्ज (Enrollment form), महाविद्यालयीन संलग्नता (Continuation/Extension) प्राचार्य व शिक्षक मान्यता (Approval) जाहिरात-मसुदा व बिंदुनामावली इ. गोष्टी तपासली जाणार नाहीत, याची आपण आपल्या उच्च स्तरावर नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे सदरची संबंधित ऑनलाईन माहिती भरतांना काही समस्या/अडचणी उद्‌भवल्यास नोडल — अधिकारी/अधिक्षक, सांख्यिकी कक्ष, दुसरा मजला, खोली क्रं २०२ येथे कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत प्रत्यक्ष भेट घेवून संबंधित माहिती विषयी जाणकारी/मार्गदर्शन करून घेणे अथवा ०२२-२२७०८७३८/२२६१८९८७ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, जेणे करून विचारण्यात आलेली ऑनलाईन माहिती योग्य वेळेत, विनांविलंब, अचूकतेने पुढील योग्य त्या कार्यालयीन कार्यवाहीसाठी विविध प्राधिकरणे व संचालनालय इ. यांना सादर करणे शक्य होईल, याची कृपया नोंद असावी.



Scanned by CamScanner

# मुंबई विद्यापीठ



टिप्पणी :- १. सर्व संबंधितांनी **Students on Roll** व **AISHE** ऑनलाईन माहिती भरून झाल्यानंतर त्याबाबतचे एकत्रित स्वरूपातील हमीपत्र/प्रमाणपत्र भरून मुंबई विद्यापीठ सांख्यिकी कक्ष, फोर्ट, यांच्याकडून विनाविलंब ना-हरकत प्रमाणपत्र **(No Objection Certificate)** घेणे अनिवार्य आहे.

२. सर्व स्थरातील **AISHE** व **MIS** ऑनलाईन माहिती भरताना विद्यार्थी संख्या व इतर माहितीमध्ये तफावत नसावी, ती अचूक असावी.

नोडल अधिकारी
**(AISHE/MIS Cell)**

मुंबई : ४०० ०३२
दिनांक : १५ ऑक्टोबर, २०१८

प्रतः-

मुंबई विद्यापीठतील सर्व विभाग प्रमुख व विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये, स्वायत्तता महाविद्यालये व संस्था यांचे प्राचार्य व संस्था प्रमुख यांच्या पुढील योग्य त्या कार्यालयीन कार्यवाहीसाठी व माहितीसाठी अग्रेषित.

<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाही करीता रवाना</u> :-

१. संचालक, शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण,मध्यवर्ती इमारत पुणे-४११ ००१ ,यांच्या माहितीस्तव सादर.
२. परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०९८.
३. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
४. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई- ४०००३२.
५. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
७. उपकुलसचिव, नाव नोंदणी विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
८. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
९. अधिक्षक, आवक विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.
१०. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी-४१५६३९.

उपरोल्लेखित विभागीय अधिकारी यांना असे कळविण्यात येते की, विद्यार्थी संख्या **(Students on Roll)** बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था यांनी भरणे अनिर्वाय असून सदर माहिती न भरल्यास त्या विभागाचे/महाविद्यालय/संस्थेच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज **(Enrollment Form** <u>महाविद्यालयाची संलग्नता **(Continuation/Extension)** / प्राचार्य / शिक्षकमान्यता **(Approval)**</u> परिक्षा अर्ज **(Exam.Form)** व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नये. असे आदेश मा. संचालक, संचालनालय, उच्चशिक्षण विभाग, पुणे, व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेला असून त्याप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतर पुढील कार्यालयीन कार्यवाही करावी.

नोडल अधिकारी
**(AISHE/MIS Cell)**

Scanned by CamScanner